# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम.,जी. एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.१५.०३.२०२३ रोजी आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई
२) मा. अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) मा. सहाय्यक संचालक, (लेखा) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) मा. विधी सल्लागार, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५) मा. श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल.
६) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल.

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्दे व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| १ | शै. व. २०२३-२४ साठी सादर प्रस्तावांचा आज दिनांकपर्यत तपशील. | ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदाविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क सन २०२३-२४ साठी खालील प्रमाणे दि.१२/०३/२४ पर्यंत प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.<br>Online प्रस्ताव Confirm केलेल्या संस्था - ७७३<br>बैठकीत एकूण फी प्रस्तावांची छाननी करण्यात आली - ७४०<br>शिल्लक प्रस्ताव - ३३ (Hard Copy प्रस्ताव प्राप्त नाही)<br>मंजूर शुल्क प्रस्ताव - ५३३<br>त्रुटी प्रस्ताव पाठवले -२०७ | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती<br>तात्काळ |

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| २ | शै.व. २०२१-२२ करिता उशिरा शासन निर्णय प्राप्त संस्थांच्या शुल्क मंजूरीबाबत चर्चा | शै.व. २०२१-२२ करिता उशिरा शासन निर्णय प्राप्त संस्थांकडून आर्थिक वर्ष २०२२-२३ वर्षातील खर्च फॉर्म अ१ अ२, बॅलन्स शीत व बँक स्टेटमेंट पगार वितरणासहित असे सर्व कागदपत्र मागवून अथवा संस्थांनी आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या दिलेल्या खर्चाच्या आधारे अंदाजे १२ महिन्यांचा खर्च लक्षात घेऊन फी मंजूर करण्यात यावी. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ३ | शै.व. २०२१-२२ मध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाकी ठेवलेल्या पगाराच्या (provision of salary) बाबत व disallowed provision बाबत चर्चा करून निर्णय घेणे. | शै.व. २०२१-२२ मध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाकी ठेवलेल्या पगाराच्या (provision of salary) बाबत व disallowed provision बाबत निर्णय घेताना अशा संस्थांना फक्त ३ महिन्यांची provision allowed करावी असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ५ | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीकरिता येणाऱ्या खर्चाबाबत चर्चा. | दिनांक ०७/०५/२०२३ रोजी पासून ते दिनांक ११/०५/२०२३ रोजी पर्यंत परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीच्या खात्यावर उपलब्ध असलेल्या जमा खर्चाचे विवरण पुढील प्रमाणे -<br><br>एकूण जमा रक्कम - रु.२,४०,६०,००२/-<br>एकुण खर्च रक्कम - रु.२५,३४,१९५/-<br>एकूण शिल्लक रक्कम - रु.२,१५,३५,८०७/- | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ. क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ५ | शै. व. २०२३-२४ साठी मंजूर शिक्षण शुल्काची पुनर्रछाननी शुल्क कमी करणेबाबत खाजगी नर्सिंग असोसिएशन यांच्या पत्रावर चर्चा | शिक्षण शुल्क प्राधिकरण, मुंबई यांच्या धर्तीवर शिक्षण शुल्काची पुनर्रछाननी शुल्क प्रति संस्था रुपये ५००००/- ठरविण्यात आलेले आहे. शुल्क नियामक प्राधिकरण पुनर्रछाननी शुल्क विद्यार्थी संख्येनुसार लागू करत नाही. त्यामुळे सदर पुनर्रछाननी शुल्क कायम ठेवण्यात येत आहे. (संदर्भ दिनांक १६/११/२०२२ रोजी झालेल्या शिक्षण शुल्क प्राधिकरण, मुंबई यांच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्रति संस्था रु. ५०,०००/-). | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती<br>तात्काळ |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, तथा सदस्य

सहाय्यक संचालक,
लेखा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ तथा सदस्य

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष